**दर्जेदार मराठी नाट्य निर्मितीसाठी पॅकेज :**

(१) नाट्य निर्मिती संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी अनुदान देण्याची योजना

(२) व्यावसायिक नाट्यस्पर्धेत सुधारणा

(३) राज्य (हौशी) नाट्यस्पर्धेमध्ये सुधारणा

(४) बाल नाट्यस्पर्धांमध्ये सुधारणा

(५) हिंदी, संस्कृत आणि संगीत नाट्यस्पर्धांमध्ये सुधारणा.

महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक सांकास. २००५/प्र.क्र. ३८८/सांका-३,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक २ मार्च २००६.

**संदर्भ.**—संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक सांकास/४४८४, दिनांक २१ नोव्हेंबर २००५.

**प्रस्तावना.**—मराठी चित्रपट निर्मितीसाठी ज्याप्रमाणे राज्य शासन आर्थिक मदत करते, उत्कृष्ट चित्रपटांना पारितोषिक देते, त्याप्रमाणे नवीन नाटकांसाठी राज्य शासन अनुदान देईल अशी जाहीर घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १ जून २००५ रोजी २००५ रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या दादर-माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्य संकुलाच्या उद्घाटन प्रसंगी केली होती. त्यानुसार नाट्य निर्मिती संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी अनुदान देण्याची योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनातर्फे नाट्य महोत्सवाचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊन त्या अंतर्गत विविध पारितोषिके दिली जातात. या प्रकारच्या हौशी व व्यावसायिक नाट्य स्पर्धा व बाल नाट्यस्पर्धामधूनच अनेक नामावंत कलाकार, दिग्दर्शक, अभिनेते व तंत्रज्ञ मराठी रंगभूमीला लाभले आहेत. महाराष्ट्रातील नाट्यकलेचा उत्कर्ष व विकासास हातभार लावण्याच्या दृष्टीने नवीन नाट्य निर्मितीसाठी नाट्य निर्मिती संस्थांना अनुदान देण्याची आणि हौशी, व्यावसायिक व बालनाट्य इत्यादी नाट्य स्पर्धेत सुधारणा करून विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्याची योजना तयार करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार रुपये १ लाख देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय.**—नाट्य निर्मिती संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी अनुदान देणे, व्यावसायिक नाट्यस्पर्धेत सुधारणा करणे, राज्य (हौशी) नाट्यस्पर्धेमध्ये सुधारणा करणे, बालनाट्य स्पर्धांमध्ये सुधारणा करणे तसेच हिंदी, संस्कृत आणि संगीत नाट्यस्पर्धांमध्ये सुधारणा करणे इत्यादी बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या. विचारांती शासन खालील योजनेस मान्यता देत आहे :—

**(१) नवीन नाटकाच्या निर्मितीसाठी, पूर्वी पासूनच नाट्य व्यावसायात कार्यरत असलेल्या नाट्य संस्थांना अनुदान देण्याच्या योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :—**

सातत्याने नाट्यनिर्मिती करणाऱ्या नाट्य संस्था या योजनेसाठी पात्र असतील. याकरीता संस्थांचे वर्गीकरण खालील गटात करण्यात येईल.

| अनु-क्र. (१) | नाट्य संस्थेच्या अस्तित्वाची किमान वर्षे (२) | किमान नाट्य निर्मिती संख्या (३) | एकूण किमान प्रयोग संख्या (४) | दर्जा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | २० वर्षा पेक्षा जास्त | ४० | ३००० | ए |
| २ | १० ते २० वर्षे | १० | २००० | बी |
| ३ | ५ ते १० वर्षे | ५ | १००० | सी |
| ४ | ३ ते ५ वर्षे | ३ | ३०० | डी |

वरीलप्रमाणे दर्जा मिळविण्यासाठी नाट्य संस्थेने अस्तित्वाची वर्षे, नाट्यनिर्मिती संख्या, एकूण प्रयोग संख्या या सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. अशा नाट्य संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी खालीलप्रमाणे अर्थ सहाय्य दिले जाईल.

(१) नाट्यसंस्थांना एका सर्वस्वी नव्या नाटकाची प्रयोग निर्मिती व प्रयोग करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाईल.

(२) हे अर्थसहाय्य नाट्य प्रयोगाच्या संख्येप्रमाणे देण्यात येईल.

(३) एका प्रयोगासाठी रुपये १५,००० एवढे अर्थसहाय्य दिले जाईल.

(४) एखादी नाट्यसंस्था संगीत नाटक निर्माण करीत असल्यास त्यांना एका प्रयोगासाठी रुपये २०,००० एवढे अनुदान देण्यात येईल.

(५) वर्गीकरणानुसार पुढीलप्रमाणे कमाल प्रयोग संख्येसाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

"ए" दर्जाच्या नाट्यसंस्था . . १०० प्रयोग
"बी" दर्जाच्या नाट्यसंस्था . . ७५ प्रयोग
"सी" दर्जाच्या नाट्यसंस्था . . ५० प्रयोग
"डी" दर्जाच्या नाट्यसंस्था . . २५ प्रयोग

(६) नवीन नाट्य निर्मितीसाठी व त्यांचे प्रयोगासाठी आगाऊ रक्कम न देता दर २५ प्रयोगानंतर अनुदान देण्यात येईल. यासाठी पुरेशी रक्कम संचालक (सांस्कृतिक कार्य) यांच्याकडे सुपूर्द करण्यात येईल.

(७) हे सर्व नाट्यप्रयोग केवळ मुंबई येथे न होता त्यापैकी किमान ५०% प्रयोग सर्व महसुली विभागात करण्यात यावेत.

(८) नाट्य प्रयोगांचे तिकीट दर रुपये १००, रुपये ७० व रुपये ५० यापेक्षा जास्त असू नयेत.

ही योजना नाट्य संस्थेचे ज्याप्रमाणे अर्ज येतील त्याप्रमाणे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर राबविण्यात येईल. त्यामुळे प्रतिवर्षी अंदाजे रुपये २.५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

सदर योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून अंमलात येणार असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पित करण्यात यावी.

**(२) व्यावसायिक नाट्यस्पर्धेत सुधारणा :**

विद्यमान योजनेनुसार प्राथमिक फेरीतून अंतिम स्पर्धेसाठी १० नाटकांची निवड होते. त्यातून पहिल्या येणाऱ्या ३ नाटकांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके अनुक्रमे रुपये ९०,०००, रुपये ६०,००० व रुपये ३०,००० असे दिले जाते. त्याऐवजी प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकांची रक्कम अनुक्रमे रुपये ५ लाख, रु. ३ लाख, रु. २ लाख अशी राहील.

**(३) राज्य नाट्यस्पर्धा**

प्रतिवर्षी राज्य नाट्य महोत्सवाअंतर्गत प्रादेशिक पातळीवरील मराठी (२१ केंद्रे), हिंदी (२ केंद्रे), संगीत (१ केंद्रे), संस्कृत (१ केंद्र) व अंतिम मराठी (१ केंद्र) पारितोषिक विजेत्यांना पारितोषिके दिली जातात त्यात खालीलप्रमाणे सुधारणा/वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे :—

| अ. क्र. (१) | फेरी (२) | सध्याची पारितोषिक रक्कम (३) | सुधारित पारितोषिक रक्कम (४) |
|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक मराठी नाटक. . | प्रथम ३,०००<br>द्वितीय २,०००<br>तृतीय १,००० | प्रथम १०,०००<br>द्वितीय ७,०००<br>तृतीय ५,००० |
| २ | अंतिम मराठी नाटक . . | प्रथम २२,५००<br>द्वितीय १५,०००<br>तृतीय १०,०००<br>चतुर्थ ८,०००<br>पाचवे ६,००० | प्रथम १,००,०००<br>द्वितीय ५०,०००<br>तृतीय २५,०००<br>चतुर्थ १५,०००<br>पाचवे १०,००० |

| (१) | (२) | | (३) | (४) |
|---|---|---|---|---|
| ३ | हिंदी नाटक | . . | प्रथम १२,००० | प्रथम २५,००० |
| | | | द्वितीय ६,००० | द्वितीय १५,००० |
| | | | तृतीय ४,००० | तृतीय १०,००० |
| ४ | संस्कृत नाटक | . . | प्रथम ६,००० | प्रथम १५,००० |
| | | | द्वितीय ४,००० | द्वितीय ७,००० |
| | | | तृतीय ३,००० | तृतीय ५,००० |
| ५ | संगीत नाटक | . . | प्रथम १८,००० | प्रथम ३५,००० |
| | | | द्वितीय १२,००० | द्वितीय २५,००० |
| | | | तृतीय ६,००० | तृतीय १५,००० |

**(४) बालनाट्य स्पर्धा :**

बालनाट्य स्पर्धांची प्राथमिक फेरी पाच केंद्रांवर होते. नंतर अंतिम फेरी होते.

| प्राथमिक फेरी (५ केंद्रे) | | पारितोषिकांची रक्कम (सध्या) | सुधारित रक्कम |
|---|---|---|---|
| | प्रथम | ३,००० | १०,००० |
| | द्वितीय | २,००० | ५,००० |
| | अपंग-बालनाट्य संस्थेला उत्तेजनार्थ | २,००० | ५,००० |

| अंतिम फेरी | | पारितोषिकांची रक्कम (सध्या) | सुधारित रक्कम |
|---|---|---|---|
| | | रु. | रु. |
| | प्रथम | ११,००० | २५,००० |
| | द्वितीय | ७,००० | १५,००० |
| | तृतीय | ५,००० | १०,००० |
| | अपंग-बालनाट्य संस्थेला उत्तेजनार्थ | २,००० | ५,००० |

उपरोक्त स्पर्धांसाठी परीक्षकांना सध्या देण्यात येणारे मानधन रुपये १५१ वरून रुपये ४५० एवढे व दैनिक भत्त्याची रक्कम रुपये २५ वरून रुपये ७५ एवढी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रवासभत्त्यासाठी प्रत्यक्षात प्रवासाच्या खर्चाची रक्कम अनुज्ञेय राहील.

**(५) महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार :**

नाट्यकला ही महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय कला असून तिला १५० हून अधिक वर्षांची परंपरा आहे. महाराष्ट्र शासनातर्फे मोठ्या प्रमाणात हौशी नाट्यस्पर्धा, व्यावसायिक नाट्यस्पर्धा, बालनाट्यस्पर्धा आयोजित करण्यात येतात. या स्पर्धांच्या माध्यमातून अनेक कलाकार, दिग्दर्शक मराठी रंगभूमीला लाभलेले आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे लता मंगेशकर पुरस्कार, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, व्ही. शांताराम पुरस्कार, राज कपूर पुरस्कार इत्यादी पुरस्कार दिले जातात. त्याच धर्तीवर नाट्य क्षेत्रातील एकूण कामगिरीसाठी (Lefetime Achievement) महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार रुपये १ लाख दरवर्षी देण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे. हा पुरस्कार संगीत शाकुंतल नाटकाचा पहिला प्रयोग सन १८८० साली दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी झाला त्या दिनांकास म्हणजे दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी दरवर्षी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त १ व ५ येथील योजनांच्या अनुषंगाने नाट्य निर्मिती संस्थांचा दर्जा ठरविण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्य रंगभूमी जीवन गौरव पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीची शिफारस करण्यासाठी समित्या गठित करण्याचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. उपरोक्त २, ३ व ४ येथील नाट्यस्पर्धांच्या नियमावलीमध्ये तदनुषंगिक दुरुस्ती/सुधारणा करण्याचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल. या सुधारणा पुढील आर्थिक वर्षापासून अंमलात येणार असल्याने त्यासाठीच्या अंदाजे रुपये २४ लाख एवढ्या जादा खर्चासाठी व जीवन गौरव पुरस्कारासाठी **रुपये १ लाख** यांकरीता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९२/०६/व्यय-१४, दिनांक १३ फेब्रुवारी २००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मीना जोशी,**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

मा. मंत्री/मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव.
सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहायक
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-१४/विनियम), मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, अर्थसंकल्प, सा.न्या.सां.का. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का. सांका-२.